# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 07/07/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

## मोबाईल ॲप लावणार वाहन अपघातांना ब्रेक

रस्ते अपघाताचे विश्लेषण करण्यासाठी केंद्र सरकारच्या रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय (MORTH) यांनी IIT चेन्नई यांच्या सहकार्याने Integrated Road Accidents Database (iRAD) हे ॲप विकसित केले असुन झालेल्या अपघातांचे तपशीलवार माहिती iRAD ॲपमध्ये भरलीजाते.

नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर अंतर्गत 22 पोलीस ठाण्यामध्ये अपघाताची माहिती iRAD ॲपमध्ये भरण्याचे काम मा. पोलीस अधीक्षक, श्री राकेश ओला यांच्या मार्ग दर्शनात सुरू असुन आता पर्यंत 250 अपघातांची नोंद iRAD ॲपमध्ये घेण्यात आल्याची माहिती जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विलास काळे यांनी दिली आहे. iRAD ॲपमध्ये अपघाताची माहिती भरण्याकरीता नॅशनल इन्फॉरमेटीक सेंटर (National Informatic centre) जिल्हाधिकारी कार्यालय येथील श्री. अय्यर व श्री. नितेश तायवाडे यांनी नागपूर जिल्हा ग्रामीण मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे करीता दिनांक 08/02/2021 व दिनांक 12/02/2021 रोजी NIC सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे प्रशिक्षण आयोजित करून अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

iRAD ॲपमध्ये भरण्यात येणाऱ्या अपघाताच्या माहितीचे विश्लेषण करून सदर जागेवर भविष्यात अपघात घडु नये याकरीता आवश्यक त्या प्रतिबंधक उपाययोजना करण्यात येतात जेणे करून अपघातांचे प्रमाण कमी करण्यास तसेच अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण कमी होण्यास निश्चितच मदत होईल.

सदरची बातमी आपल्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावी ही विनंती.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर